# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
ता.जि.ठाणे - ४०११०१ दुरध्वनी क्र. २८१८११८२, २८१९२८२८.

## मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील थकबाकीदार यांच्या जप्त केलेल्या मालमत्तांचे जाहिर बोली पद्धतीने लिलावाची जाहीर नोटीस

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रांतील सर्व नागरिकांना कळविण्यांत येते की, महानगरपालिका हद्दीतील मालमत्ता कराची थकबाकी असलेल्या मालमत्तांना जप्त करण्यात आलेल्या असून सदर जप्त केलेल्या मालमत्तांचे बोली पद्धतीने लिलावव्दारे विक्री करणेकरीता जाहिर लिलाव स्व. बाबासाहेब आंबेडकर भवन (नगरभवन), मांडली तलाव, भाईंदर (प.) येथे दिनांक ०१/०२/२०२३ ते दि. ०२/०२/२०२३ रोजी सकाळी ११:०० ते सायं. ०५:०० पर्यंत करण्यांत येणार आहे.

तरी ज्या इच्छुक व्यक्तीस/ संस्थेस वरील लिलावात भाग घ्यावयाचा आहे, त्यांनी वरील दिवशी व निश्चित केलेल्या वेळेवर उपस्थित रहावे.

खालीलप्रमाणे लिलावाच्या अटी-शर्ती ज्या व्यक्तीस/ संस्थेस मंजूर असतील त्यांनीच लिलावामध्ये भाग घ्यावयाचा आहे.

१) लिलावात भाग घेण्यासाठी प्रवेश अर्ज (फॉर्म) त्यांना दि. १६/०१/२०२३ ते दि. ३०/०१/२०२३ पर्यंत सकाळी ११:०० ते दुपारी ०३:०० वाजेपर्यंत मिळतील.

२) लिलावाच्या अटी-शर्ती व जप्त केलेल्या मालमत्तांची यादी कार्यालयीन वेळेत मालमत्ता कर विभाग, मुख्य कार्यालय येथे कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

३) लिलावात भाग घेवू इच्छीणाऱ्या व्यक्तीस भाग घेण्यासाठी फॉर्म फी रु. १०००/- भरुन भाग घेता येईल. (एका फॉर्म सोबत केवळ एका व्यक्तीस प्रवेश देण्यात येईल.)

४) लिलाव फॉर्म स्विकारण्याची अंतिम मुदत दि. ३०/०१/२०२३ रोजी दुपारी ०३:०० पर्यंत असून लिलावामध्ये भाग घेवू इच्छीणाऱ्यांनी फॉर्म सोबत इसारा रक्कम म्हणून रु. ५०,०००/- चा धनाकर्ष (डी.डी.) सादर केल्यानंतरच अर्जदारास लिलावात भाग घेता येईल.

ठिकाण :- मिरा भाईंदर महानगरपालिका,
मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

अतिरीक्त आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

जा.क्र. मनपा/कर/२९८७/२०२२-२३
दिनांक :- १३/१/२०२३
आ.क्र. मनपा/माहिती व जनसंपर्क/५०६/२०२२-२३
दि. १३/०१/२०२३